CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ३१ ऑगस्ट २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३३१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## बस चालकाशी वाद घालून कंडक्टरला शिवीगाळ

### प्रवाशावर गुन्हा

✔ **सोलापूर** : एसटी बस चालकाची वाद घालून कंडक्टरला शिवीगाळ केल्याप्रकरणी एका प्रवाशाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास सोलापूर एसटी स्थानकात घडली. याप्रकरणी सैफनसाब मकदुमसाब शेख (वय-२५, व्यवसाय एसटी कंडक्टर, रा.कुडल हंगरगा ता. आळंद) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून राजकुमार नागप्पा बबलाद (वय-४४, रा. हत्ती कणवस ता.अक्कलकोट) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

सैफनसाब व बस चालक गौतम लाळवंत हे मिळून केए.३२.एफ.२४४४ या आळंद ते सोलापूर बसने प्रवास करत होते.त्यावेळी राजकुमार हा हत्ती कणबस येथे बसमध्ये चढला.त्यावेळी त्याने चालक गौतम लाळवंत याच्याशी वाद घातला. त्याला एसटी कंडक्टर शेख यांनी शांत केले. परंतु सोलापूर एसटी बस स्थानक येथे पार्किंग मध्ये राजकुमार बबलाद याने सैफनसाबला तू नीट खाली उतर मी सोलापूरचा आहे. तुला बघून घेतो असे म्हणून शिवीगाळ करत अंगावरील शर्टाच्या खांद्यावरचे बॅच ओढून फाडून खाली पाडले. तपास स.पो. नि. पाटील हे करीत आहेत.

# काँग्रेसची ‘त्सुनामी’

# १४००जण पडले ‘सुंदरी’च्या मोहात



✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**भारतीय राजकारणाचा तराजू केव्हा आणि कधी कुठल्या राजकीय पक्षाच्या पारड्यात झुकेल, याचा नेम नाही. भारतीय जनता पक्षाला केंद्रीय सत्तेत येण्यासाठी २५ वर्षांची प्रतिक्षा करावी लागली तर एक दोन नव्हे तर केंद्रात आणि विविध राज्यांमध्ये ६० वर्षे सत्तेचे अधिराज्य गाजवली काँग्रेस २०14 च्या निवडणुकीत भुईसपाट झाली. पुढे पुढे तर देश काँग्रेसमुक्त हेच चित्र पहायला मिळाले.तब्बल दहा वर्षे राजकीय विजनवासात राहिलेल्या काँग्रेसला २०२४च्या निवडणुकीत पुन्हा झुकते माप मिळाले.काँग्रेसचा आत्मविश्‍वास वाढला.आता महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला अच्छे दिन देण्याचे संकेत आहेत. आमदारकीसाठी एक-दोन नव्हे तर तब्बल १४०० जण आमदारकीचे स्वप्न उराशी बाळगून काँग्रेसच्या दारात उभे असल्याचे चित्र समोर आले आहे.**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेससाठी सुकाळ येवू लागला आहे. लोकसभेतील घवघवीत यशानंतर आता विधानसभेसाठीही काँग्रेसमधून इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र समोर आले आहे. हे चित्र पाहून काँग्रेसची जणू ही त्सुनामी असल्याचे राजकिय जाणकार सांगतात. राज्यातील विधानसभेतील २८८ जागांसाठी काँग्रेसकडे तब्बल १४०० हून अधिक इच्छुकांचा अर्ज आला आहे. त्याामध्ये मराठवाडा आणि विदर्भातील इच्छुकांची संख्या मोठी आहे.

महाराष्ट्रात काँग्रेसने केलेल्या अंतर्गत सर्व्हेत ८० ते ९० जागा जिंकण्याचा अंदाज आहे. तसेच हा पक्ष राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरेल असेही सांगितले जात आहे. यावरून काँग्रेसने इच्छुकांचे अर्ज मागितले होते. या अर्जांची संख्या जवळपास तिप्पट झाली आहे. २०14 आणि २०१९ मध्ये विधानसभेला काँग्रेसने ४२ आणि ४४ जागा जिंकल्या होत्याा. २०१९ ला शरद पवारांमुळे काँग्रेसला या जागा टिकविता आल्या होत्या असेही सांगितले गेले होते. आता पाच वर्षांत ही परिस्थिती बदलली असून काँग्रेसच्या ९० जागा येतील असा अंदाज आहे. यामुळे मविआच्या बैठकीत काँग्रेसने १३५ जागा लढविण्याचा प्रस्ताव ठेवल्याचेही सांगितले जात आहे.

### दहा वर्षांनंतर कमबॅक

२०14 नंतर भाजप महाराष्ट्र विधानसभेत हळूहळू मजबूत पक्ष बनला तर त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या जागा कमी होत गेल्या. २०14 मध्ये काँग्रेसने ४२ जागा जिंकल्या होत्या, तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने ४४ जागा जिंकल्या होत्या. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील निकालाच्या आकडेवारीनंतर २८८ मतदारसंघांपैकी ९० विधानसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेस आघाडीवर असल्याचे सांगण्यात येते. २०१९ मध्ये काँग्रेस पक्षाकडे केवळ ४७६ अर्ज आले होते, परंतु आता ही संख्या तिप्पट झाली आहे.

### संख्या तिपटीने वाढली, भाजपच्या मोहिमेला धक्का

२०14 पासून भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे काँग्रेस दुबळी पडत चालली होती, त्यातच २०१९ मध्ये भाजपमध्ये जाणाऱ्या लोकांची संख्या जास्त होती. यामुळे काँग्रेस संपली असे बोलले जात होते. गेल्या वेळच्या विधानसभा निवडणुकीपेक्षा यंदा काँग्रेसकडे इच्छुकांची संख्या कमालीची वाढली आहे. मोदींच्या काँग्रेसमुक्त भारतला यामुळे धक्का बसला आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांसाठी तब्बल १४०० हून अधिक इच्छुकांचे अर्ज काँग्रेसकडे आले आहेत. २०१९ मध्ये हीच संख्या ४७६ एवढी होती. २०१९ मध्ये भाजपमध्ये जाणाऱ्या लोकांची संख्या जास्त होती. यामुळे काँग्रेस संपली असे बोलले जात होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप नेते तसाच प्रचारही करत होते. परंतु, यंदाच्या लोकसभेला काँग्रेसने १०० चा आकडा गाठला आणि नाऊमेद झालेल्या नेत्यांमध्ये पुन्हा एकदा आशेचा किरण दिसू लागला आहे.

### काँग्रेसचे मिशन २०२४

काँग्रेसने नुकतेच २८८ विधानसभा मतदारसंघांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. पक्षातील एका वरिष्ठ नेत्याच्या माहितीनुसार बैठकीत काँग्रेसने १३५ जागांवर निवडणूक लढवण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. मुंबईतील ३६ पैकी २२ जागांवर शिवसेना ठाकरे गट इच्छुक आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ५-७ जागांवर लक्ष केंद्रित करत आहे. मुस्लीम आणि दलित मतांमुळे काँग्रेसने मुंबईत जास्त जागांवर लक्ष्य ठेवले आहे. त्यामुळे मुंबई, मराठवाडा आणि विदर्भात जास्त जागा जिंकल्या तर काँग्रेसची सत्ता येण्याची शक्यता जास्त आहे. ज्याच्याकडे जास्त जागा असतील तो मुख्यमंत्रिपदाचा दावेदार असेल.

### विदर्भ-मराठवाड्यात मुसंडी

लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने १७ जागा लढवल्या आणि त्यातील १३ जागांवर विजय मिळवला. त्यामुळे काँग्रेस नेत्याांचा आत्म विश्वास वाढल्याची चर्चा आहे. काँग्रेसने अंतर्गत सर्व्हे केला असून त्यामध्ये पक्षाला विधानसभेत ८० ते ८५ जागा मिळतील आणि काँग्रेस राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरेल असे सांगण्यात आले. त्यामुळे काँग्रेसने सर्व जागांवरील इच्छुकांचे अर्ज मागितले होते. त्यासाठी आता १४०० हून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये गेल्या काही काळापासून भाजपची मजबूत पकड होती. लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने या भागात जोरदार मुसंडी मारल्याचे दिसून आलं.

## मोहोळमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग

### तरूणावर गुन्हा दाखल

✔ मोहोळ/प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीस शाळेतून बाहेर बोलावून तिच्या मैत्रिणींसह अल्पवयीन मुलांना घेवून तिचा विनयभंग केल्या प्रकरणी मोहोळ पोलिसात २४ वर्षीय तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजमेर महंमद शेख असे त्याचे नाव आहे.

मोहोळ शहरातील एका शाळेतील विद्यार्थिनींच्या अजमेर शेख मागे लागला होता. माझ्याशी तू लग्न कर असे म्हणत तिला त्रास देत होता. मात्र ती मुलगी त्याला नकार देत होती. २९ ऑगस्ट रोजी अजमेर हा त्या शाळेत गाडी घेऊन गेला व तिला शाळेतून बोलावून घेतले. आपण बाहेर फिरून येऊ असे म्हणत तिला गाडीत बसायला सांगितले. तिने मैत्रिणीला सोबत घेतले. तिच्या अल्पवयीन मैत्रिणीने तिच्या गल्लीतील अल्पवयीन दोन मुलांना सोबत घेतले. शेख याने चौघांना सोबत घेत सोलापूर गाठले. एका हॉटेलमध्ये चारही अल्पवयीन मुला-मुलींना जेवण खायला घातले.

त्यानंतर शेख याने त्या मुलीला मी तुझ्याशी लग्न करीन, तू जर नकार दिला, तर तुझे बाहेर अफेअर आहे असे सांगून तुझी बदनामी करीन, अशी धमकी दिली. सोलापूरहून येताना सावळेश्वर टोल नाक्याजवळील पेट्रोल पंपाजवळ गाडीतील इतर तिघांना शेख याने गाडीतून खाली उतरवले व त्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अजमेर शेख याच्यावर बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर करीत आहेत.

**पालकांनी आरोपीला पकडून पोलिसांना दिले**

मुलगी शाळेत नसल्याबाबत पालकांना समजले. पालक शाळेत गेले व त्या ठिकाणी मुले नाहीत म्हणून सर्वत्र शोधा शोध सुरू केली. पाच वाजण्याच्या सुमारास तरुण चार चाकी गाडी घेऊन शाळेच्या जवळ मुलांना सोडायला आला असता काही पालकांनी त्याला पकडले व पोलिसांच्या ताब्यात दिले.

## दादांनी ‘रथ’ थांबवला, आता सारथ्य मुलाच्या हाती

✔ माढा/प्रतिनिधी



माढा तालुक्यात हरितक्रांती घडवून आणण्यात मोठे योगदान दिलेले राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे यांनी आगामी विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे.आता इथून माझा मुलगा तथा सोलापूर जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे हे माढ्यातून विधानसभेची निवडणूक लढवतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे माढ्याचा संभ्रम दूर झाला आहे. तब्बल २९वर्षे स्वतःची आमदारकी लोकांच्या सत्कारणी लावलेल्या दादांनी थांबण्याचा निर्णय घेतल्याने माढेकरांना हुरहुर लागली.

१९९५ पासून आपण सर्वांनी मला मोठ्या मताधिक्क्यांनी निवडून दिले. मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे आगामी विधानसभा मी लढेन की नाही, याबाबत मला शंका असून येणाऱ्या निवडणुकीत आपले सुपुत्र रणजितसिंह शिंदे यांना एक संधी देण्याचे भावनिक आवाहन त्यांनी केले.

माढा येथील माढेश्वरी अर्बन बँकेच्या २९ व्या वार्षिक वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत असताना आ. बबनदादांनी हे आवाहन केले. रणजित शिंदे यांना ५ वर्षे संधी द्या तोही चांगले काम करेल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

माढा विधानसभा मतदारसंघातून आमदार बबनराव शिंदे हे सलग सहा वेळा निवडून आले आहेत.

**रणजित शिंदे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ हातात घेऊन निवडणूक लढविणार की शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची तुतारी हाती घेणार, याची उत्सुकता लागली आहे. मात्र शिंदे यांच्यासाठी विधानसभेची आगामी निवडणूक सोपी असणार नाही, हेही तितकेच खरे आहे.**

**अभिजित पाटलांविरूद्ध लढतीची शक्यता**

विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनीही माढा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीत अभिजीत पाटील यांच्याविरोधात रणजितसिंह शिंदे यांची लढत होण्याची शक्यत आहे.

राष्ट्रवादीतील फुटीनंतर ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटात दाखल झाले होते. गेल्या काही दिवसांपासून आमदार बबनराव शिंदे हे निवडणूक लढवणार नाहीत, अशी कुजबूज सुरू होती. त्यावर खुद्द बबनदादांनीच पडदा टाकला आहे.

आमदार बबनराव शिंदे हे १९९५ पासून सलग सहा वेळा माढा विधानसभा मतदारसंघातून निवडून आले आहेत. आता त्यांचे चिरंजीव रणजितसिंह शिंदे हे विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. बबनराव शिंदे यांनी पहिल्यांदाच उघडपणे आपल्या पुत्रासाठी मत मागायला सुरुवात केली आहे.

## संजय कुमार घोडके दोन वर्षासाठी तडीपार

✔ **सोलापूर** : विविध प्रकारचे गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारास दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून तडीपार केले आहे. संजय कुमार घोडके (वय-३६, रा. केशवनगर झोपडपट्टी, मौलाली चौक, दक्षिण सदर बाझार सोलापूर) असे तडीपार केलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. संजय कुमार घोडके यांच्याविरुद्ध सन २०२४ या कालावधीमध्ये नागरिकांना शिवीगाळ व मारहाण करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे यासारखे गुन्हे दाखल होते. आरोपीमुळे परिसरातील नागरिक, व्यवसायिकांमध्ये मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण होते. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायामुळे त्याच्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी नागरिक धजावत नव्हते. त्यास तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव देण्यात आला होता.

## इलेक्ट्रॉनिक्स वस्तू देण्याचे आमिष दाखवून गंडा

✔ **सोलापूर** : इलेक्ट्रॉनिक्स वस्तू देण्याचे आमिष दाखवून ७ लाख ४० हजार रुपयाची फसवणूक केल्याची घटना दि.१ एप्रिल २०२४ ते १० मे २०२४ दरम्यान न्यू पाच्छा पेठ येथे घडली.

याप्रकरणी पुष्पाबाई विठ्ठल लिंबोळे (वय-४९, रा.न्यू पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अन्वर बुज्जी (रा.मंगळूर उडपी जवळ, कुंदापूर कर्नाटक) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अन्वर याने फिर्यादीस इलेक्ट्रॉनिक वस्तू देतो असे आमिष दाखवत पैशाची मागणी केली. पुष्पाबाई यांना मोबाईलचे ज्ञान नसल्याने त्यांची मुलगी वैशाली हिने ७ लाख ४० हजार रुपये टप्प्याटप्प्याने फोन पे द्वारे पाठवले.परंतु अन्वर याने फिर्यादी यांना कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तू न देता फसवणूक केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोसई. मोरे हे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**नाडी तपासून ओळखतो, उलट्या-जुलाब आणि पक्ष!**

कल्याण
246-20-280

मुंबई
299-06-349

## विरोधकांना धोबीपछाड देत राजाभाऊंनी ताकत दाखवली

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीवर भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी आपल्या मर्जीतील प्रशासकीय संचालकांची नियुक्ती करून स्वतःची जबदरस्त ताकत दाखवून दिल्याने बार्शीचे राजकारण ढवळून निघाले आहे. विशेष म्हणजे राऊतांनी आपल्या भावाच्यात समितीच्या चाव्या देवून टाकल्या आणि एकहाती सत्तेची दोरी आपल्या हातात ठेवली आहे. राऊतांच्या या ताकतीने महाविकास आघाडीची पाचावर धारण बसली आहे.**



राजेंद्र राऊत

या समितीवर राऊतांची सत्ता होती. संचालक मंडळाची अंतिम मुदतवाढ संपल्यानंतर अशासकिय सदस्यांच्या प्रशासकिय मंडळाच्या नियुक्तीसाठी आ. राऊत यांनी सात जणांची नावे पाठवली होती. बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य प्रशासकपदी भावाची, तर प्रशासकिय संचालकांमध्ये मर्जीतील कार्यकर्त्यांची वर्णी लावत राऊत यांनी पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे. राऊत हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीसांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. अशासकिय प्रशासक मंडळासाठी शिवसेना आणि राष्ट्रवादीकडूनही नावे पाठवली होती. मात्र, राऊतांनी महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला धोबीपछाड दिली.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदतवाढ ही २३ जुलै २०२४ रोजी संपली होती. त्यानंतर बाजार समितीवर प्रशासक म्हणून सहायक निबंधक उमेश पवार यांची नियुक्ती करण्यात आली होती. पणन संचालकांच्या आदेशानंतर आ. राजेंद्र राऊत यांचे बंधू विजय राऊत यांनी प्रशासक उमेश पवार यांच्याकडून बाजार समितीचा पदभार स्वीकारला. राऊत यांनी सात जणांची नावे पाठवली होती. ती सर्व नावे राऊत यांचे निकटवर्तीय होती. आमदार राऊत यांनी आपले राजकिय वजन वापरत बाजार समितीची सत्ता पुन्हा एकदा एकहाती राखली आहे.

आमदार राजेंद्र राऊत यांच्याकडून अशासकिय प्रशासक मंडळासाठी राऊतांचे बंधू विजय राऊत, शाहूराजे निंबाळकर, रोहित पाटील, युवराज बारबोले, ओंकार धायगुडे, ज्ञानेश्वर नाळे, अमोल चव्हाण यांची नावे पाठवली होती. हे सर्वजण भाजपचे विशेषतः राऊतांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात.

राऊत यांच्यानंतर राष्ट्रवादीकडून मुजमील पठाण, सुनील झाल्टे, तर शिवसेनेकडून आनंद यादव, भगवंत पाटील यांची नावे अशासकिय प्रशासकिय मंडळासाठी सरकारकडे दाखल करण्यात आले होती. राजेंद्र राऊत यांनी शिवसेना आणि राष्ट्रवादीला धोबीपछाड देत केवळ आपल्या समर्थकांची प्रशासकिय मंडळावर नियुक्ती करण्यात यश मिळविले आहे. बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीवर भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांची सत्ता होती. संचालक मंडळाची अंतिम मुदतवाढ संपल्यानंतर अशासकिय सदस्यांच्या प्रशासकिय मंडळाच्या नियुक्तीसाठी आमदार राऊत यांनी सात जणांची नावे पाठवली होती. ती सर्व नावे राऊत यांचे निकटवर्तीय होती. बार्शी बाजार समितीच्या अशासकिय प्रशासक मंडळात संधी मिळालेले तिघेही राजेंद्र राऊतांचे निकटवर्ती आहेत. त्याामुळे बार्शी बाजार समितीच्या अशासकिय प्रशासक मंडळातून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य इच्छुकांना डावलण्यात आल्याचे नव्या यादीतून स्पष्ट होते.

**राऊत यांनी आपल्या निकटवर्तीयांची नावे पाठवल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना नेत्याांकडूनही अशासकीय प्रशासकीय मंडळासाठी धावपळ करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून आणि शिवसेनेकडून प्रत्येकी दोन नावे पाठवण्यात आली होती. मात्र, आमदार राऊत यांनी आपले राजकीय वजन वापरत बाजार समितीची सत्ता पुन्हा एकदा एकहाती राखली**

CMYK